# प्रभुतरुण

| वर्ष ४८ | अंक ७ | मुंबई | जानेवारी २०१५ | पाने ६ | किंमत रु. १ |
|---|---|---|---|---|---|

*(स्थापना : तारीख २५ ऑगस्ट १९२३)*

**तत्त्वाचा बंदा जीव । मूर्तीला कोण विचारी?**

**www.prabhutarun.org**

*संपादिका:* **सुहासिनी कीर्तिकर** *कार्यकारी संपादक मंडळ :* **मिनाक्षी जयकर, मयुरा नायक, संजना कोठारे, वैजयंती कीर्तिकर**

*संपादकीय*

## शुभेच्छा!

**—सुहासिनी कीर्तिकर**

मित्रहो, नवीन वर्षाची सुरुवात चांगल्या गोष्टीने करावी. म्हणूनच अगदी सुरुवातीला तुम्हा सर्वांना माझ्या आणि अर्थातच ‘प्रभुतरुणा’च्या मनापासून शुभेच्छा! हे ‘कॅलेंडर इयर’ तुम्हा सर्वांना ‘अच्छे दिन’ दाखविणारेच असो. या शुभेच्छा मनापासून देण्याचे मननीय आणि मानसिक कारण काय? ते तर असणारच ना? योगशास्त्र जाणणारे असं सांगतात की रोज उठल्या उठल्या सकाळी आरशासमोर उभे रहायचे. ते तर आपल्यापैकी अनेकजण उभे रहातच असतील. पण इतकंच पुरं नाही. आरशातल्या आपल्या प्रतिमेकडे बघून आपण प्रसन्न हसायचे. हसलं की आपलं मन प्रसन्न होतं. आत्मविश्वास वाढतो. प्रतिमेतील आपल्या वरवरच्या दिसण्याकडे दुर्लक्ष होऊन फक्त हसरेपण लक्षात रहाते. ते हसरेपण म्हणजे ‘आत्म’त्व. ते सक्काळी सक्काळी असं आपल्यात उतरलं की प्रतिमा म्हणजेच आपण असं अद्वैत बनतं. उणीवा बाजूला पडतात. आपण कुणीतरी आहोत, निश्चितच इतरांपेक्षा वेगळे आणि खूप खूऽऽप चांगले आहोत, सक्षम आहोत, अशक्य ते शक्य करून दाखविणारे आहोत असे दिवसाच्या सुरुवातीलाच वाटते. सकारात्मक उर्जा आत आत दाटून येते. मग काय? संपूर्ण दिवस सुंदर, सुरळीत, मनाजोगा असा पार पडतो. हे योगशास्त्रातील एक छोटेसे नेमकार्य किती साधेसे अन् महत्त्वाचे आहे ना? मंडळी, मी या लेखाच्या सुरुवातीलाच तुम्हा मंडळींना शुभेच्छा दिल्या त्यामागे हेच नेमकार्य आहे. कारण तुम्ही सर्व मित्रमंडळी (हितेच्छु, वाचक, सहकारी इत्यादी इत्यादी सर्व त्यात आलीच.) म्हणजे ‘प्रभुतरुणा’चा स्वच्छ, नितळ आरसा आहात. या आरशात पाहून अशा शुभेच्छा दिल्या, हसरा चेहरा केला की दोन हजार पंधरा हे साल ‘प्रभुतरुणा’लाही खूप चांगले जाणारच. आहे की नाही गंमत? अहो, अशा गंमती असल्या कीच दिवसामागुनि दिवस, ऋतुमागुनी ऋतु चांगले जातात. तेव्हा आले ना लक्षात? गंमती गंमतीत आयुष्य पुढे सरकले की दिवस कसे भराभर जातात! हे उजाडत असलेले नववर्षही उजाडले उजाडले म्हणताना कधी दोन हजार सोळाच्या उंबरठ्यावर येऊन मावळेल; पत्ताही लागणार नाही. तसेच, अगदी तस्सेच होवो!

अर्थात् शुभेच्छांचे बळ असलं कितीही तरी सगळं काही भागणार नाही, याचं भान मला आहे हं! ‘उबार’ कंपनीला आपल्या देशात बंदी झाली तरी असली प्रकरणं ‘दुबार’ होऊ नयेत म्हणून नुसत्या शुभेच्छा असून भागणार नाही. आजच्या प्रचंड वेगवान जगण्यात स्त्रीकडे केवळ देहरूपी उपभोग्य वस्तू म्हणून पहाणं थांबलं पाहिजे. एकीकडे स्त्रीकडे ती ‘शिकली, प्रगती झाली’ म्हणून आदरानं पहायचं, कॉर्पोरेट जगात तिचा मित्र म्हणून वावरायचं, तिला व्यावसायिक जगात उंचावर जाण्यासाठी शिक्षण, स्वातंत्र्य द्यायचं. पण त्याचवेळी तिचं शरीर मात्र वात्सायनानं सांगीतलेल्या शास्त्रासाठीच आहे फक्त; असा भ्रम बाळगायचा. ही दुहेरी भ्रम असणारी भ्रमरवृत्तीला चंगळवादी वास्तव म्हणून स्वीकारणारी वृत्ती जोवर आहे तोवर फक्त शुभेच्छांचं बोट धरून काय होणार? पुरा समाजच ‘सुसंस्कृत’ झाला पाहिजे? सुसंस्कृत या शब्दाचा आवाका फार मोठा आहे. त्याचा अवकाश आजच्या जागतिकीकरणात, आर्थिक उलाढालीत, ज्ञानाच्या प्रचंड सैराट प्रवाहात, सरमिसळ समाजात, राजकीय वातावरणात विस्तारत गेला आहे. कालदृष्ट्या अन्वय बदलले आहेत. कुटुंब मांडणीचे अन्वय बदलले आहेत. अशावेळी

(पान २ कॉलम १ वर)

*विस्तारीत संपादकीय*

## Happy New Year!

**-Sanjana Kothare**

Hey folks, although I am supposed to be writing in our mother tongue inorder to comply with the technical formalities of our newsletter, I chose to write in the Queen's language this time not only because of the subject of this article but since I wanted to reach out to our community people who are averse to reading or for that matter even speaking our mother tongue. I have been told that many of our readers touch the newsletter only if they see the Queen's familiar alphabets beckoning them to pick up the paper and go through it. There have been many who have objected to the change in the language of our newsletter however they fail to understand that, "He who rejects change is the architect of decay."

We have about 90% of our Pathare Prabhu community people who are comfortable reading, writing and speaking the English language; hence the necessity of Marathi being the language of our newsletter can safely be limited only to comply with the technical requirements. As rightly said by Pauline R. Kezer, "Continuity gives us roots; change gives us branches, letting us stretch and grow and reach new heights." We would not like to decay and hence I would like to bring about this change and communicate in a language which can be related by majority of our community people. The language which can be read and understood by 100% of our literate community and that language happens to be English.

When we talk about 'change' how often do we actually incorporate that change in our lives and accept that 'change' gracefully? With each passing day we follow our regular routine and a pleasant change in our lives is brought about by special days which we all celebrate in jubilation. It is a change and a welcome change from our mundane lives. Be it Birthdays, Anniversaries, Valentine's Day, Mother's Day, Diwali, Dasera or even the New Year. The mobile companies make sky rocketing business during these so-called 'special' days. However, do these days make any 'change' as such in our lives? Or let me put it this way, do we make efforts to bring about a change in our life following such special days?

For instance a Birthday is celebrated as a party and the joy of living through another year and entering the next year. Does the 'special' day bring about any significant change in us besides the physical attributes? Do we introspect and make efforts in bringing about a positive change in our behavior or any shortfalls that one possesses? Or do we like to believe that we are 'God's man' who does not need a change? Wouldn't we become better human beings if we were to bring about that 'change' in ourselves?

Although it may sound clichéd at times but don't we all love the euphoria connected to those words? Happy Birthday… Happy Anniversary… Happy Diwali … blah blah … and now Happy New Year!!! At times I wonder if some people actually understand the wishes that they pass on when they wish someone. Many a times, it seems as though forwarded wishes are sent without even reading the message that is being forwarded.

These are joyous days for sure if the wishes are really meant in the true sense and not just in the form of forwarded messages sent as a formality.

(Cont. on Page 2 col. 3)

(पान १ कॉलम २ वरून)

अशा संस्कृतीत 'सु' आचरण मनानं, बुद्धीनं असणं हे अत्यावश्यक आहे. अगदी छोटसं उदाहरण घेऊ. आपल्याच 'परभू' पणाचा अभिमान बाळगताना एकेकाळी आपली संस्कृती आपल्या समाजात विवाह करून रीतसर सामावलेल्या एखादीला 'आडू जात' म्हणून हिणवत होती वा चेष्टेचा विषय करीत होती. आज काय परिस्थिती आहे? 'नांदा सौख्यभरे' पहा म्हणजे कळेल. अनेकजण 'आडू जाती'चे आपल्यात येतात किंवा आपल्यातून आडू जातीत जातात. म्हणून मग सुसंस्कृत म्हणवून घेताना आज 'आंतरजातीय विवाह' वेगळेपणाने न देता 'नांदा सौख्यभरे' मध्येच आपण त्यांना सामावून घेतले ना? काळानुसारे असं मनानं मोठं असणं सुसंस्कृत असण्याचाच भाग आहे. असं सुसंस्कृत होऊन पूर्ण समाजानंच आज संस्कृतीसमृद्ध असलं पाहिजे.

असं संस्कृतीसमृद्ध झालो आपण सर्व भारतीय तरच मागच्या काही वर्षांवर ओरखडे काढणाऱ्या घटना इथून पुढं घडणार नाहीत. शाळेच्या बसमध्ये स्त्री मदतनीस ठेवावी लागणे, रिक्षावाल्यांवर वचक ठेवण्यासाठी त्यांचे चित्र अन् क्रमांक 'वॉटसअप'वर टाकणे, स्टेशनसारख्या गर्दीच्या ठिकाणी कॅमेरे बसविणे, इमारतीच्या लिफ्टमध्ये वेगळी सुरक्षायंत्रणा निर्माण करणे, धार्मिक मेळ्यांत छुपे पोलीस राखणे हे सगळे तोकडे प्रयत्न आहेत. यात आणखी कितीही भर टाकली तरी जोवर आपण सुसंस्कृत नाही आहोत तोवर आपल्या मधील 'आदिमानवा'चे सतत फावणारच. त्याला स्त्रीमधील 'मादी'च दिसत रहाणार. असे होऊ नये याकरिता माणसाला संस्कृतीपेक्षा बुद्धी लाभली आहे. तारतम्य, विकास, निरामय सुख याबद्दलच्या कल्पना या बुद्धीनेच स्वीकारल्या आहेत. या वर्षी या कल्पनांना धुमारे फुटोत. हे वर्ष आर्थिक, राजकीय भरभराटीसह संस्कृतीच्या बाबतीतही भरभराटीचे जावो.

मित्रहो, संपूर्ण - सकल समाजाचा विचार करून मी वरील शुभेच्छा दिल्या आहेत. मला पूर्ण खात्री आहे की आपण 'परभू' पूर्वीही सुखसमृद्ध होतो, सुसंस्कृत होतो, हसत रहात होतो, विकसनशील होतो; आजही तसेच आहोत. तेव्हा आपण काही वेगळे प्रयत्न करायला नकोत. पण सगळे मिळून एकत्रितपणे पूर्ण भारतीयांना अधिक सुसंस्कृत होण्यासाठी शुभेच्छा देऊयात. कारण आपल्या अवतीभोवतीचा इतर समाजही आपलाच आरसा ना?

हा आरसा नितळ असला की हे वर्ष छानच जाणार. मग दोन हजार पंधरा हे वर्ष याच आरशात पुढच्या डिसेंबरच्या आगेमागे डोकावून बघेल. स्वत:च हसेल. या आरशालाच विचारले आत्ममग्न होऊन - 'आरशा, आरशा मला सांग, या सगळ्या वर्षांमध्ये सगळ्यात सुंदर कोण?' हिमगौरीच्या आईने विचारले होते ना? तस्सेच. 'आरशा, आरशा, या सगळ्या वर्षांमध्ये सगळ्यात सुंदर कोण?' आरसा स्वच्छ मनानं आपलाच वेध घेईल. अंतर्मुख होईल अन् मनापासून खरं खरं उत्तर देईल. ''हे दोन हजार पंधरा साला, इतक्या सगळ्या वर्षांत तूच सगळ्यात सुंदर आहेस. सुसंस्कृत आहेस, समृद्ध आहेस, सुखी आहेस.

आरशानं असं उत्तर द्यायचं असेल; म्हणजे आपल्यालाच अशा उत्तराची अपेक्षा असेल तर आपल्या वागणुकीचा पारा या आरशाला चकचकीत करण्यासाठी वापरला पाहिजे.

अरेच्या हे सगळे फारच 'बोधप्रद' (म्हणजेच कंटाळवाणं) व्हायला लागलंय का? मग वाचकहो, त्या संदर्भात तुमच्या सहनशक्तीचा पारा चढण्यापूर्वी थांबतेच इथे. पण एकच सेकंद हं. पुन्हा सांगते; तुम्हा सर्वांना नवीन वर्षाच्या खूप खूप शुभेच्छा!

*

## पत्र प्रतिक्रिया

मा. संपादिका,
प्रभुतरुण
स. न.

प्रभुतरुणाच्या नोव्हेंबर महिन्याच्या अंकातील श्रीमती स्वाती राणे हिचे पत्र वाचले. प्रवीण व स्वाती बरोबर मी व सौ. अक्षदाने खूप वर्षे ज्ञातीय संस्थांच्या अनेक कार्यक्रमांत एकत्र काम केले. त्यापैकी सं. संशयकल्लोळ, सोशल समाजाचे नमन नटवरा, पडघम व सं. नलदमयंती. महत्त्वाचे म्हणजे बहुतेक तालमी त्यांच्या कल्पना अपार्टमेंटमधील फ्लॅट मध्येच झाल्या आहेत.

सं. नलदमयंतीच्या प्रयोगाच्या आठवणी लिहीताना पुढील त्रुटी राहून गेल्या आहेत. सं. नलदमयंतीची सुरुवात प्रवीण व सौ. अक्षदानी सूत्रधार व नटी या भूमिकेतून गायलेल्या नांदीने झाली.तसेच कलाकाराचे नाव अमर अजिंक्य नसून अमर विनोद देसाई आहे. तसेच ह्या प्रयोगातील सेटची व प्रकाश योजनेची जबाबदारी सं. संशयकल्लोळप्रमाणे माझ्यावर होती. महत्त्वाचे म्हणजे त्यातील काही ट्रिकसीनसाठी लागणारी इलेक्ट्रॉनिक सर्किट्स मी स्वत: बनवली होती.

कळावे,

आपला
**अजित प्रमोद तळपदे**

विस्तारीत संपादकीय
(पान १ कॉलम ४ वरून)

When we mean Happy New Year it is meant to pass on good wishes and moreover 'grow' as a human being by bringing about a 'change' in oneself as a person in the forthcoming year. With the passage of each year, a resolution is made by many eventually to be broken, however it shows one positive sign that the person realizes the mistakes he/she has been committing so far and intends to rectify it in the coming year. The positive note being: the sense of 'self-realization'.

How many of us introspect and take efforts to mend ourselves? New Year is only looked upon as 'party time' by all of us. Gathering around with friends or family to have a joyful time to welcome the New Year, but isn't the party just like any other party we usually have? All that changes is the yearly calendar. People remain the same; their sentiments and their behavior towards everyone also remain the same. Then what is so special about bringing in the New Year with such an extravaganza when nothing changes? Is such a celebration only meant for the yearly calendar? Such high regards for a mere change in calendar which shows the upcoming long weekends to party harder?

Have we even paused to look at our lives? Every day teaches us something new. We meet different people who treat us differently. Some with love, care, compassion, some with hatred, some with curiosity, and some with envy, so on and so forth. The same goes for the existing people in our life. As we enter a new year, besides getting over a hangover why don't we try to cleanse our conscious to be a better human being in future? The New year morning is spent by all forwarding 'Happy New Year' messages to all on their phone list but are we willing to 'change' our behavior and actually be instrumental in making that year 'Happy' for the person we just wished?

It is sad to note that mandatory wishes which have only remained as words sans any emotions are doing the rounds in all the mobile phones and social networking sites. Whether one has any feelings towards the other or not, what does it take to type three words as text or better still a forwarded message which does the trick of fulfilling a formality?

Happy New Year! Mean it from the heart and it really conveys such heartfelt emotions which I have been fortunate to experience from many who conveyed their good wishes to me on the first day of this wonderful year. The emotions are conveyed through sound, through communication which has lost its value with the 'change' brought about by technology. Well, that is contradictory to the 'change' I am talking about as I am looking towards a positive 'change' in our lives and not something that would ruin the existing warmth of relations which can be effectively communicated through direct speech.

Looks like the use of technology is to safeguard oneself and avoid direct communication so that the true feelings are kept under wraps. A message sent with a smiley or a winky plays safe even if one does not intend to smile. Similarly a Happy …. , Happy… message is easily sent across even if one does not wish happiness for the other. Wishing someone a good year means that you really wish the New Year brings in good luck and happiness to the one you wish. However if we are not willing to 'change' our own behavior towards that person and continue to harbor ill-feelings towards the other person be it in the form of hatred, despise, jealousy, anger or even EGO, does the word 'HAPPY' in your wishes mean anything at all?

The New Year needs to be welcomed with a 'change' and that too with a positive change in every form. Be it in the form of progress of the world, the nation, or even in the progress of 'oneself'. This special day ought to be celebrated with all the pomp and jubilation to commemorate the upcoming 'change' which we are to bring about by self-realization. What better way to celebrate the new 'you' by leaving behind the negativities of oneself and 'changing' yourself to spread happiness. However one needs to have a big heart to acknowledge the fact that one needs that 'change' else this ritual of wishing each other, "Happy … , Happy …" is going to be limited only to words which do not mean anything.

Let us begin the New Year by bringing about a 'change' in ourselves and see ourselves grow as a good human being as we change the pages of our calendar and be responsible in making a 'positive change' in the lives of our family and friends as we wish each other a Happy New Year next year.

*

लेखांक-१

# अर्थसंवाद

-सौ. उर्वशी आनंद धराधर

(यावर्षी अर्थपूर्ण 'अर्थसंवाद' सुरू करीत आहोत. सौ. उर्वशीताईंच्या अनुभवातून हा संवाद **सार्थ** होईलच

-संपादक)

बँकिंग व्यवहार आजकाल खूपच सुटसुटीत झाले आहेत. 'बँक आपल्या खिशात' ही जाहिरात तर आपण पाहिली असेलच. परवाच बँकेची वेब-साईट आपल्या हातातील भ्रमणध्वनीवरून पाहताना माझ्या मनात विचार आला की, जग किती पुढे गेले आहे. बँकांमध्ये असणाऱ्या सोयी, सुविधा नियमावली यांची माहिती, बँकेच्या शाखांचा पत्ता, दूरध्वनी क्रमांक आपल्याला केवळ बोटाच्या स्पर्शाने चटकन् पाहता येतो. पत्त्यांची वही, टेलिफोन पुस्तक जवळ बाळगण्याची बिलकूल गरज नाही.

आजच्या धावपळीच्या जगात जिकडे Innovating is currency आणि speed हा आत्मा आहे तिथे ही प्रगती आवश्यकच आहे. आपण बँकेत पूर्वी खाते उघडायला जात होतो तेव्हा व आता यात खूप फरक आहे. आता आपण आपली माहिती देताक्षणीच आपले खाते उघडले जाते.

प्रश्न असतो की काय माहिती द्यावी? बँकेत आपले खाते उघडणे खूप सोपे आहे. आपला फोटो व आपले ओळखपत्र व आपल्या घराचा पत्ता घेऊन जावे लागते. आपले ओळखपत्र व घराचा पत्ता कसा द्यावयाचा असतो? खालीलपैकी कोठल्याही एका दाखल्याने हे काम होऊ शकते.

(१) पासपोर्ट
(२) ड्रायव्हिंग लायसन्स
(३) मतदात्याचे ओळखपत्र
(४) पॅन कार्ड
(५) आधार कार्ड (UIDAI द्वारा दिलेले)
(६) NREGA Card

या दाखल्यामुळे तुमचा पत्ता लिहिलेला असल्यामुळे पत्त्यासाठी वेगळे कागदपत्र द्यावे लागत नाही.

आता आपण जर कामासाठी दिल्लीला असाल आणि आपला यावरील दाखल्यांवरचा पत्ता मुंबईचा असेल तरी देखील आपणास दिल्लीला बँकेत खाते उघडता येते.

तुम्ही तुमच्या मुंबईच्या घराचा पत्ता त्याच्यासाठी (कम्युनिकेशनसाठी) देऊ शकता.

पण प्रश्न पडतो की बँकांना ओळखपत्र व पत्ता यांची गरजच काय? बँकांना या दोन्ही गोष्टी त्यांच्या खातेदाराची नीट ओळख पटावी म्हणून आवश्यक असतात. ज्याला आपण `Know Your Customer' असे म्हणतो.

पण समजा माझ्याकडे वर उल्लेख केल्याप्रमाणे काहीही कागदपत्र नसले तरी मी बँकेत खाते उघडू शकतो काय? 'हो नक्कीच'. तुम्ही खाते उघडू शकता. पण आपणास छोटे खाते उघडता येते. तुम्हाला तुमचा फोटो देऊन बँकेच्या फॉर्मवर सही करून खाते उघडता येते. हे 'छोटे खोते' म्हणजे काय?

या खात्यात ५०,०००/- रुपयांहून अधिक शिल्लक ठेवता येत नाही. संपूर्ण वर्षात जमा झालेली रक्कम १,००,०००/- रुपयांहून जास्त असता कामा नये. या खात्यातून काढली जाणारी रक्कम महिन्याला १०,००० रुपयांहून अधिक असता कामा नये. तुमच्या खात्याला `Low Risk' खाते असे संबोधिले जाते. कारण त्यात जास्त रक्कम भरता येत नाही. याशिवाय तुम्हाला केंद्र/राज्य सरकार द्वारा देण्यात आलेले ओळखपत्र व त्यावरील फोटो सहितही हे खाते उघडता येते. अथवा गॅझेटेड ऑफिसरने तुमच्या फोटोला Attestation देऊन त्या दाखल्यानेही हे 'छोटे खाते' उघडता येते.

तेव्हा बँकेत माझे खातेच नाही, ही सबब पुढे करू नये. आपल्याकडे कोठलाच दाखला नाही म्हणून बँकेत आपली गाडी अडता कामा नये.

या साऱ्या गोष्टी आपल्या खात्यात आपण जे पैसे भरतो ते सुरक्षित रहावेत म्हणून भारतीय रिझर्व्ह बँकेने काळजीपूर्वक केल्या आहेत.

आज आपले खाते उघडल्यावर भ्रमणध्वनी नंबर दिल्यास आपल्या खात्यातील शिल्लक आपल्या खात्यात एखादी रक्कम जमा झाली वा काढली गेल्यास आपणास त्वरित कळते. त्यामुळे आपण कोठेही असलो तरी आपल्या बँकिंग व्यवहाराची सुरक्षितता आपणास मिळते. तेव्हा चला, बँकेत खाते उघडून बँकेशी संवाद साधू या!

*

# त्यांनी चक्क माझे भूत पाहिले!

-उज्ज्वला गोविंदराव भगवंतराव आगासकर

लहान मुलापासून वयस्क व्यक्तीपर्यंतच्या कुणाच्याही काळजाचा ठोका ज्या एका शब्दाच्या उच्चाराने चुकतो, तो शब्द म्हणजे 'भूत' (तुमचा चुकला नाही का? तर तुम्ही लहानही नाही आणि वयस्कही नाही!) वास्तविक शास्त्राच्या परिभाषेमध्ये जर ठोकून ठाकून, गुणधर्म तपासून अस्तित्व सिद्ध केले तरच प्रमाण मानता येईल अशा सर्व गोष्टींच्या यादीमध्ये परमेश्वरही बसत नाही आणि भूतही बसत नाही. (अंधश्रद्धा निर्मूलनवाले, तुमच्याकडून माझा सत्कार अपेक्षित नाही!) सुशिक्षित आणि विचार करू शकणाऱ्यांच्या चर्चेमध्ये जेव्हा हे दोन्ही विषय येतात तेव्हा चर्चा करूनकरून विषयांचे भुसकट पडते आणि शेवटी निष्कर्ष काहीच निघत नाही, प्रत्येकजण आपापल्या कुवतीवर आधारित असे मत तयार करून त्याला लटकत राहातो. अशिक्षितांच्या बाबतीत तर सगळा आनंदच असतो. त्यांनी स्वत:चा असा काही विचार करणे अपेक्षित नसते. इतरांनी काय सांगितले, इतरांची मते काय, अनुभव काय, या साऱ्या गोष्टींची वल्ही हाताशी धरून ते सामुदायिक अनुभवाच्या होडीमध्ये बसतात आणि कोणतीही दिशा न धरता निरुद्देश अखंड वल्हवीत राहातात!

प्राथमिक शाळेतल्या एका लहान मुलाने, गुरुजींना विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देताना असे सांगितले की, अमेरिका आणि चंद्र यापैकी खरे कोण? तर रात्री आकाशात शोधले तर चंद्र दिसतो म्हणून तो खरा, पण येथून दिसत नाही म्हणून अमेरिका खरी नाही. यातला गमतीचा भाग सोडून देऊ. पण आपल्या आसपास कित्येक गोष्टी अशा घडताना दिसतात, ज्या कुणी केल्या याचे सरळ किंवा स्पष्ट उत्तर मिळत नाही. अशा वेळी त्या गोष्टींचे परिणाम चांगले असतील तर त्या 'देवाने केल्या' असे कुणीही म्हणते, आणि परिणाम वाईट असतील तर त्या 'भुताने केल्या' असे म्हणतात. थोडक्यात काय, तर नजरेला न दिसणाऱ्या परंतु परिणाम दाखवून देणाऱ्या अज्ञात शक्तीबद्दलचे आपले हे सर्व तर्क असतात! आणि या दोन्ही अज्ञात शक्तींबद्दलच्या ऐकीव गोष्टींची तिखटमीठ लावून चर्चा करीत राहाणे हा एक सर्वांचा आवडता टाइमपास आहे. आता अशा या टाइमपासमध्ये अनेक अनपेक्षित गोष्टी ऐकायला मिळतात. पण तुम्हालाच जर कुणी येऊन म्हणाले की आम्हाला तुमचे भूत दिसले, तर तुमची काय अवस्था होईल? तुम्हाला खरे वाटणार नाही, पण असा प्रसंग माझ्यावर येऊन गेला! त्याचीच गोष्ट तुम्हाला सांगावी म्हणते.

नाशिकमधल्या सर्वात मोठ्या अशा प्रायव्हेट फर्ममध्ये आर्किटेक्ट म्हणून नोकरी करण्यासाठी मी त्या शहराचा रस्ता धरला होता. तेथे अनुभवही चांगला मिळत होता, संपर्कही चांगले निर्माण होत होते. मात्र स्वतंत्र प्रॅक्टिस करायची तर कुठेतरी वाट बदलायला हवी होती. मी लवकरच तेथून राजीनामा दिला. अर्थात घरच्यांना आनंद झाला, की आता ही मुंबईला परत येईल. मात्र मी

(पान ५ कॉलम १ वर)

## हसरी रेखा

-प्रदीप कोठारे



# युवामंच

(कु. अंजोर परेश कोठारे यांच्या सदरामुळे युवामंच खऱ्या अर्थाने युवा झाला -संपादक)

## A post-it to the WORLD

Dear WORLD , I have just stepped out of school . I have embarked on a journey where everything is new to me , everything that I see is novel. The fear of uncertainty , the fear of the unknown , the fear of stepping into the dark grips me to an extent where one would suffocate.

School was a different ball game altogether. There , I was protected . Things would get done even without me being aware of it. Early in the morning ,while leaving for school I would wave my hand to my mom and say ,"Aai , I am off to school ". Up to now , I was the queen of the roost .I was the boss of my own backyard. I always had people to soothe my feelings and repair my wounds. But now…things have changed, drastically , for better or worse will be revealed later.

Now every morning I get up ,walk down the stairs and say , "Aai ,I am going to college". Things are quite different . Now I realize that this adventure which I am about to venture , is full of queer incidences . To live in this world I will require love , courage and faith. I urge you WORLD , to take me by my young hands and teach me things that you feel I should know . But , gently if you can . Teach me that for every scoundrel there is a hero , for every enemy there is a friend . Teach me that bullies are the easiest people to lick.

Give me quiet time to brood on the eternal mystery of life. Give me time to fall in love with books , to experience the bliss of chirping birds, soaring peaks , gushing rivers , tranquil lakes, ferocious seas and melodiously swaying trees . Give me the strength to close my ears on howling mobs and have faith in what I do. Give me the power to envisage the future and takes steps early on , to assert myself on what I feel is right .

Teach me that it is far more honourable to fail than to cheat. Teach me to have a sense of gratitude towards every person in my life , to be thankful for everything that I have. But , with this teach me to have the zeal and passion to reach the zenith , the pinnacle where everyone will look at me with awe. Teach me to regard all but respect a few, teach me to filter the truth from this vast ocean of masked intentions. Teach me to be a responsible citizen and do my bit towards my country. I don't want to have any regrets , they defeat the very purpose of life . Teach me to have faith in myself and instill faith in others .

Teach me gently , but don't cuddle. Because the test of fire makes fine steel. This is a really big order , WORLD , but I hope you will do what you can.

**-Anjore Paresh Kothare**

✳

# बालविभाग

## BRAVE SHYAMU

Once upon a time in Sri Lanka a small village was named Hastapur. The village is named Hastapur because of its Happiness, Care, Unity and Love. All the people were happy. The people never quarelled. Winthin a few days a Sarpanch was also created. But there were some people who were illiterate. The weekly market was open on Tuesday. There was a lot of crowd and one man came there who was infected by disease name " Anger". The disease was contagious. Within a few days all the villagers except Shyamu and his family got infected. Even the "Sarpanch' was infected. Shyamu was literate person. He was well studied in the city and had come to visit his grand mother. Each and every minute he thought of an idea, but there was no solution. Many days went by. The people of the village were in anger. Whosover they met, they started fighting. They hit each other with wooden sticks. There eyes were filled with red blood. From their nose smoke used to come. Shyamu was very scared. Some people rushed like mad bulls. For 2 to 3 days there was silence then again it started. Shyamu's mother and his family were also thinking of an idea. But everone failed. Shyamu took care that no one should go out of the village. Some times he thought of going back to his city. But then he thought of his granny getting infected. Even the other children were affected. At night people looked like ghost walking, some running and fighting. The news spread all over the country. It was an epidemic. The news of the contagious disease spread all over to Sri lanka. The Governor send a letter to Shyamu in which he asked Shyamu to leave the village. But Shyamu did not leave. Afer a few days Shyamu got an idea. He went to India and brought some world famous scientists to his country. Shyamu then told them his plan and the scientists started working on the plan accordingly. By that time people's anger grew a lot. The scientist tried their best. Many days went by. They still tried their best and one scientist got infected. Now it was more difficult. Somehow they made the medicine, but there was one difficulty that how to give medicine to those people, because they could also get infected. 2 to 3 days passed; but they were still thinking. Then one of them got an idea, he told it to everyone. The idea was to make gas out of the solid medicine and then spread on the village. That idea really worked. The Governor thanked those scientists and were rewarded. The scientists went back to India and the Governor gave Shyamu a prize for helping the poor villagers. Later Shyamu thanked everybody. He was now world famous as was now known as "Brave Shyamu".

**-Shriya Jayakar**

✳

## अभिनंदन

✶ श्री. महेश कोठारे आणि श्री. आदिनाथ कोठारे या सिनेक्षेत्रातील यशस्वी कलाकारांची विलेपार्ले येथील मॅजेस्टिक गप्पात मुलाखत झाली. महाराष्ट्र टाइम्सने त्याचा विस्तृत वृत्तांत दिला.

✶ 'आयबीएन लोकमत' वरील 'पॉईंट ब्लँक' या निखील वागळेंच्या कार्यक्रमात सारस्वत बँकेच्या व्यवस्थापक सौ. उर्वशी धराधर यांचा सहभाग होता.

✶ 'झी' वाहिनीवर 'आम्ही सारे खवय्ये' मध्ये पा. प्र. महिला समाजाच्या पदाधिकाऱ्यांनी 'परभू' पदार्थ करून दाखविले. वंदना नवलकर, वृंदा जयकर, नीता सेंजित, साया नवलकर, अक्षदा तळपदे, स्वाती जयकर यांचा समावेश होता.

✶ तीस जानेवारीला शिवकर बापूजी तळपदे यांच्या विमानसंशोधनावर 'हवाईजादा' हा चित्रपट येऊ घातलाय. सुनील नांदगावकरांनी 'लोकप्रभा' मध्ये 'मरुसखा अर्थात् हवाईजादा' हा लेख या निमित्ताने लिहिला. नुकत्याच झालेल्या भारतीय विज्ञान परिषदेतही तळपदे यांच्या विमानशोधाचा उल्लेख झाला. याच महिन्यात विज्ञान भारतीतर्फे पुण्याला दोन पुस्तकांचे प्रकाशन आहे. ही पुस्तके शिवकर बापूजींवरच आहेत. 'हवाईजादा' चित्रपटात असलेल्या बारबालांचे नृत्य शिवकर बापूजींचे प्रतिमा डागाळणारे असल्याचा आक्षेप दिल्लीच्या विजय उपाध्ये यांनी घेतला आहे. या उपाध्येंना आपल्या ज्ञातीतील मान्यवरांचे पाठबळ मिळाल्यास विमानसंशोधक म्हणून शिवकर बापूजी अधिक ठसतील. खूप वर्षांनी विमानशोधाचे श्रेय ज्ञातीयाला मिळावे इतकेच.

✶ सौ. उज्ज्वला ब्रह्मांडकर यांचे चार दिवाळी अंकात साहित्य प्रकाशित झाले.

✶ 'प्रभुतरुणा'च्या कार्यकारी संपादिका सौ. वैजयंती (कीर्तिकर) सक्सेना यांना कन्यारत्न प्राप्त झाले.

✶ कु. वैजयंती विश्वास अजिंक्य पिस्तूल शूटिंगमध्ये चौथी आली. दोन जानेवारीला आंतरविद्यापीठ पिस्तूल शूटिंग स्पर्धेत मुंबई विद्यापीठातर्फे सहभाग घेण्यासाठी तिची निवड झाली. अशी निवड होण्याचा तिचा हा दुसरा सन्मान आहे. पतियाळा येथे होणाऱ्या या स्पर्धेसाठी तिला शुभेच्छा आणि अभिनंदन.

✳

## पाठारे प्रभू चॅरिटीजचे
## वैद्यकीय चिकित्सा शिबीर

रविवार, दिनांक ८ फेब्रुवारी, २०१५ रोजी सुरेश विठ्ठल हॉल, ठाकूरद्वार येथे सकाळी ९.३० ते १.३० या वेळात हे शिबीर असेल. मान्यवर धन्वन्तरींची मोफत सेवा व सल्ला ज्ञातीयांसाठी उपलब्ध केला जाणार आहे. रक्तगट जाणून घेणे, रक्तातील साखरेचे प्रमाण किती याची तपासणी करणे, मोफत कार्डियोग्राम काढणे, हाडांमधील कॅल्शियमची तपासणी करणे, तसेच कर्करोगाच्या निदानासाठी खास तपासणी करणे या शिबिरात होईल. गरजूंनी अवश्य लाभ घ्यावा, असे आवाहन चॅरिटीजचे अध्यक्ष श्री. उदय मानकर यांनी केले आहे.

**खास पाठारे प्रभूंचा ताशा**
मुंजी, लग्न, वरघोडा आणि वरातीसाठी संपर्क:-
**श्री. मंगू ताशेवाला**
मोबाईल नं.:
९९२०५८२२६५/९९३०८३८६९९
पत्ता:
खोली क्र. ७, पहिला मजला,(जयश्री मसाला वर),
बिल्डिंग नं. ६७/६९,
कामाठीपुरा ७वी गल्ली,
एम. आर. रोड, मुंबई-४०००០८

(पान ३ कॉलम ४ वरून)

म्हटले की जरा वाट पाहू या. कामे येताहेत का याची. त्यामुळे सायकलवरून दिवसभर हुंदडणे, भरपूर वाचन आणि लेखन करणे असा दिनक्रम सुरू झाला. त्यात आणखी एक गोष्ट म्हणजे तिथल्या मैत्रिणींच्या लहान मुलांशी गप्पा मारणे, गोष्टी सांगणे आणि खेळणे यात तर वेळ फारच मजेत जायचा. अशातच एकदा एका मैत्रिणीच्या भाच्याचे लग्न ठरले. मुलगी बाहेरगावची असल्यामुळे लग्न तिथेच होणार होते, आणि जाण्यायेण्यासाठी वधूपक्षाने त्यांना स्वतंत्र बस करून दिली होती. वरपक्षाकडच्या सर्वांनी मला आग्रहाने बोलावले, आणि तशी मला सुट्टीच असल्यामुळे मैत्रिणीनेही हट्ट धरला. नाही म्हणण्याचे मला काही कारण दिसेना. लग्नाला मी बरोबर येणार म्हटल्यावर बच्चे कंपनी सॉलिड खूष झाली.

लग्न ज्या दिवशी सकाळी होते त्याच्या आदल्या दिवशी दुपारी आम्ही नाशिकहून निघालो. जळगांव जिल्ह्यामधल्या नशिराबाद या ठिकाणी जायचे होते. हे नावसुद्धा कधी ऐकले नव्हते, त्यामुळे नवीन ठिकाण पहाण्याची मलादेखील उत्सुकता होती. मोगलाईमधले हे नाव जळगांव जिल्ह्यात का आणि कसे आले, याचा इतिहाससुद्धा कळला असता! वऱ्हाडाच्या बसमधली गडबड, गप्पा टप्पा, गाणी आणि गोंधळ या साऱ्यांसकट त्या शहरात पोचलो तेव्हा रात्र झाली होती. सगळीकडे मिणमिणते दिवे, अरुंद रस्ते, निरुत्साही लोक असे पाहिले इंप्रेशन घेऊनच आम्ही लगीन घराचा पत्ता शोधत तेथे पोचलो. वधूपक्ष वाटच पहात होता. पद्धतीप्रमाणे साऱ्यांचे चहापाणी, लहान मुलांचे जेवण असे सारे आटोपून त्यांनी आम्हाला मुक्कामाच्या ठिकाणी नेले. तेथूनच सकाळी परत लगीन घरास जायचे होते. हे मुक्कामाचे ठिकाण म्हणजे एक भलामोठा प्रशस्त असा दुमजली रिकामा वाडा होता. भिंतीमधून दिसणारे लाकडी ताशीव खांब, त्यावर लाकडी कोरीव कामाचे नक्षीदार कठडे असलेली लांबच लांब बाल्कनी आणि भिंतीमध्ये ठिकठिकाणी असलेले कमानदार कोनाडे पाहून लगेच लक्षात येत होते की वाडा किमान दोनशे वर्षे वयाचा आहे. मोठ्या सागवानी कोरीव दरवाजामधून आत गेल्यावर आत मोठा मोकळा चौक (ओपन टू स्काय), त्याच्या चारी बाजूंनी लाकडी फळ्यांचे दरवाजे खिडक्या असलेल्या खोल्या. या सर्व खोल्या बंद होत्या. सगळा अंधार, आणि वाट दाखवण्यापुरते जेवढे बल्ब लावले होते ते सगळे जेमतेम चाळीस वॅटचे, मिणमिणते. वरच्या मजल्यावर वाड्याच्या लांबीइतका मोठा मोकळा हॉल होता. तेथे मुक्कामाला जायचे होते. तळमजल्यावर चौकाच्या कोपऱ्यात अरुंद लाकडी शिडीसारखा जिना होता. तेथे कोपऱ्यात जिन्याच्या तळाशी एकच मोठा मोकळा हॉल होता. वाड्याची विहीर होती. तिच्याभोवती बांधलेला त्या हॉलला एक अरुंद दरवाजा, आणि आत दिवाच नाही - गुडुप्प अंधार. वरपक्षाच्या महिलांनी बाथरूम म्हणून त्या हॉलचा उपयोग करायचा होता! लाकडी जिन्याने वर गेल्यावर त्या हॉलमध्ये जेवढी फरशी होती तेवढी सगळी भरेल अशा गाद्या घालून त्यावर स्वच्छ चादरी अंथरलेल्या होत्या. वऱ्हाडामधली सगळी छोटी मुले लगेच त्यावर कोलांटउड्या घ्यायला, लोळायला लागली! थोड्या वेळाने जेव्हा लग्नाआधीच्या काही पूजा, विधींसाठी वधूपक्ष सर्वांना लगीनघरी बोलवायला आला तेव्हा लक्षात आले की तेथून परत यायला किमान मध्यरात्र होईल, दोन तरी वाजतील. इतका वेळ छोटी मुले जागी राहाणे शक्यच नव्हते. मी त्या साऱ्यांना म्हटले की माझे तिथे काही काम नाही, मी इथेच थांबते, मुले झोपतील, तुम्ही सर्व बिनधास्त जा. ते सर्वांना पटले आणि सारा वडील मंडळींचा गोतावळा कार्यक्रमासाठी निघून गेला. तिथे राहिलो फक्त सर्व पंधरावीस छोटी मुले आणि मी. त्यामुळे गाद्यांवर लोळत नकला, गाणी, भेंड्या सुरू झाल्या. बराच वेळ सगळी खिदळत होतो. नंतर मी एक कापूसकोंड्याची गोष्ट सुरू केली. जी संपता संपेना. ती ऐकता ऐकता एकेक करून सगळी पंधरावीसजणांची फौज गाढ झोपून गेली. घड्याळ पाहिले तर अकरा वाजले होते. मिणमिणते का होईना, हॉलमधले सगळे दिवे सुरूच होते. मी मनात म्हटले आपल्याला झोपून चालणार नाही. सगळ्या चिल्लर फौजेची जबाबदारी आहे. बरोबर आणलेलं एक मासिक वाचायला घेऊन हॉलच्या उघड्या दाराकडे नजर ठेवून मीही लोळायला सुरुवात केली. मात्र थोड्या वेळाने हॉलच्या उघड्या दारातून एकेक करून दहापंधरा वटवाघळे उडत आत आली आणि छताखालून हॉलमध्ये सर्वत्र किंचाळत फडफडू लागली! मी मनात म्हटले या मुलांपैकी कुणाला यांच्यामुळे काय व्हायला नको! जवळजवळ अर्धा तास त्यांचा कर्कश धिंगाणा सुरू होता, आणि मी मासिक वाचायचे सोडून ती बाहेर कधी जातात याची हताशपणाने वाट पहात होते - शेवटी एकदाची दीड वाजता ती सगळी बाहेर गेली, आणि मी वाचायला सुरुवात केली. थोड्या वेळाने लक्षात आले की बाथरुमला जाणे आवश्यक आहे. पण झोपलेल्या फौजेला सोडून कुठे तळमजल्यावर जाणार? थोडा वेळ कळ काढावी लागेल - येतीलच आता सगळे - असे म्हणत घड्याळाकडे बघत वेळ काढत होते. त्या अनोळखी गावातली सारी दुनिया झोपलेली असल्यामुळे बाहेरून आणि संपूर्ण वाड्यात माझ्याशिवाय कुणी नसल्यामुळे आतून, कसलेही आवाज येत नव्हते.

शेवटी एकदाचे, हसण्याखिदळण्याचे, बोलण्याचे आवाज दुरून येऊ लागले. ते जवळ येत येत वाड्याशी आले, मोठा दरवाजा वाजला, म्हणजे वऱ्हाडीच आले. मला आनंद झाला. सगळे येऊन पोहोचले की लगेच बाथरूमला पळता आले असते.

जिना चढल्याचे आवाज आले. सगळ्या महिलाच आधी चढत होत्या बहुतेक. आता त्यांचे बोलणे स्पष्ट ऐकू येत होते. तणतणत होत्या. 'हे असे शोभते का? आपण किती भरवशाने सोडून गेलो सगळ्यांना, आणि खुशाल दुसरीकडे म्हणजे काय? काय झाले असेल कोण जाणे.' असे म्हणत म्हणत सगळा घोळका हॉलच्या दारात आला. मी दाराकडे लक्ष ठेवून लोळतच होते. तर सगळ्या दारातून आत आल्या आणि माझ्याकडे पाहून तिथेच थाडकन उभ्या राहिल्या! कुणी एक शब्द बोलेना! शेवटी मी उठून बसले आणि म्हटले, 'अहो साडे तीन वाजलेत - फारच लांबला कार्यक्रम नाही का? चला आता मला भयंकर झोप आली आहे - 'तेव्हा त्या घोळक्यातून माझी मैत्रीण पुढे आली. माझ्या शेजारी बसली. खांद्यावर हात ठेवून म्हणाली, 'ताई, अगं, तुला फार जागरण झालं नाही का? आता स्वस्थ झोप बरं का, आम्ही सर्व आलो आहे - ' आणि ती त्या घोळक्याला म्हणाली, 'अग, ताईने बघा आपला प्रॉब्लेम किती छान सोडवला!' तेव्हा त्या घोळक्यातली एकेकजण दबकत दबकत पुढे येऊन कुणी माझ्या डोक्यावरून हात फिरवला, कुणी पाठीवर हात ठेवला. मी म्हटले एवढा काय त्यांना कृतज्ञतेचा उमाळा आलाय?

ते समारंभासाठी घातलेले कपडेसुद्धा न बदलता त्या सगळ्या माझ्याभोवती घोळका करून बसल्या आणि त्यांनी एकमुखाने मला सांगितले की, वाड्यात परत आल्यावर त्या सर्वांना बाथरूमला जायचे होते. जिन्याखालच्या अंधाऱ्या खोलीत पाऊल टाकणार तर एकदोघींना नाही, एकूण एक जणींना दिसले की, मी तिथे आतमध्ये दरवाजाकडे पाठ करून बसले आहे आणि 'नाही नाही' अशी मान हलवते आहे! आपल्या मुलांना सोडून ही इथे आली तर वरती काय झाले असेल म्हणून त्या सगळ्या पळत तणतणत वरती आल्या, तर तिथे मी लोळते आहे! आता नक्की काय खरे, हे त्यांना कळेना! वरती गादीवर लोळणारी ताईच आहे, आणि ती पोटाला कळ लागली तरी आपल्या मुलांना सोडून कुठे गेली नाही हे कळल्यावर मात्र त्या सर्वांना असे झाले की ताईला कुठे ठेऊ आणि कुठे नाही!

या घटनेला बरीच वर्षे झाली. अजून मला कळत नाही की जे झाले त्याचा अर्थ काय? तिथे 'ते' कोण होते? 'ते' माझ्यासारखे का दिसले? साडेतीन वाजेपर्यंत त्या वाड्यात माझ्याखेरीज कुणी नसताना 'ते' हॉलमध्ये आले असते तर? आणि पोटाची तडस असह्य होऊन मी एकटीच तिथे गेले असते तर?

विचार करून भेजाचे भुसकट पडते आणि उत्तर काहीच मिळत नाही!

*

## हे वाचले आहे. तुम्ही?

# नूरजहाँ

**सरोज अंबर कोठारे**

नूरजहाँ भारताची स्वातंत्र्यापूर्वीची म्हणजे १९४७ च्या आधीची. भारतातच असेपर्यंत नूरजहाँ आपल्या चित्रपट कारकिर्दीत फक्त सोळा वेळा चित्रपटांतून पडद्यावर आली आणि गाणारी नायिका असा प्रभाव पाडून गेली. तिच्या त्या काळातील नाईका खुर्शिद, अमीरबाई, पारुघोष, जोहराबाई, राजकुमारी ह्या गायिका ही नूरजहाँची जागा घेऊ शकल्या नाहीत.

नूरजहाँचा जन्म २१ सप्टेंबर १९२५ पंजाबमध्ये झाला. संगीत आणि अभिनयाची आवड तिला अगदी बालपणापासून होती.

नूरजहाँने पाच वर्षांची असताना कोलकोत्यामध्ये स्टेजवर पहिले पाऊल ठेवले. लाहोरमध्ये निर्माण झालेल्या एका पंजाबी चित्रपटात काम केले होते. तिच्या गाण्यात काहीतरी खुबी असल्याचे तिच्या भावाच्या लक्षात आले आणि उस्ताद गुलाम ह्यांच्याकडे संगीताचे शिक्षण तिला सुरू केले.

सन १९३० ते १९४० चा हा काळ होता. अभिनयासोबत गात असताना शांता हुबळीकर, काननबाला खुर्शिद, पण नुरजहांने त्या काळात आपले स्वत:चे एक वेगळे असे स्थान भारतीय रसिकांच्या मनात निर्माण केले. त्या काळातील सर्वच नायिकांसाठी नूरजहाँ ही आजच्या आपल्या लतादीदीप्रमाणे आदर्श होती. नूरजहाँने गायिलेल्या गीतांमध्ये नुरजहाँचे चित्रपट करिअर १९४० साली 'खानदान' चित्रपटापासून झाले. तिचा नायक होता प्राण. ''तू कौनसी बदलीमे छुपा, चाँद मेरे आजा'' हे गीत भारताच्या कानाकोपऱ्यात अतिशय लोकप्रिय ठरले होते. हे गीत नुरजहाँने गायिलेले होते. त्यानंतर अनमोल

(पान ६ कॉलम ३ वर)

## प्रभु तरुण आश्रयदाते

१) सौ. विमल व श्री. माधव नायक,
२) सौ. नलिनी व श्री. रविंद्र रामराव मानकर,
३) सौ. अनामिका बी. ए. एल.एल.बी.
४) कै. नटवर्य नारायण रामराव झावबा
५) कै. सॉ. मोतिराम विनायक जयकर
६) आद्य संपादक कै. विष्णु कृष्ण कोठारे
७) कै. रावसाहेब चंद्रकांत बालमुकुंद वेलकर
८) कै. सौ. सुशीला यशवंतराव कीर्तीकर
कै. सौ. सुशीला व श्री. मोरेश्वर वि. प्रधान
९) सौ. मीरा व श्री. रविंद्र नानूजी दळवी
१०) कै. सौ. शलाका (अरुणप्रभा) शैलकुमार श्रीकृष्णनाथ दळवी
११) कै. श्रीमती चंपुबाई आणि
कै. आनंदराव सुंदरजी धराधर
१२) कै. सौ. रोहिणी (रत्नप्रभा) श्रीकर राणे
१३) सौ. निलीमा व श्री. सूजन केशवराव राणे
१४) कै.श्रीमती रोझाबाई आणि कै. बाळाराम केरोबा नायक
१५) कै. शरद विनायक कीर्तिकर यांच्या स्मरणार्थ अनामिक
१६) कै. सॉ. दिलीप रघुनंदन कोठारे
१७) कै. श्रीमती कमलजा आनंदराव अजिंक्य
१८) कै. दिवाळीबाई व कै. डॉ. वामनराव आनंदराव विजयकर
१९) कै. विष्णुराज बाळाराम नायक
२०) ॲड. सदाशिव आनंदराव धुरंधर
२१) कु. कस्तूर मोठाबाई जयकर
२२) कै. कमलिनी रमाकांत प्रधान
२३) कै. नटवर्य शरद श्रीकृष्णनाथ गणपतराव दळवी
२४) आद्य मराठी लघुलिपीकार कै. भुजंगराव रामचंद्र मानकर
२५) कै. वामन मोरेश्वर प्रभाकर
२६) कै. चंद्रकांत नारायण विजयकर,
कै. कुंजविहारी वाय. जी. तळपदे,
कै. प्रविण चंद्रकांत नारायण, विजयकर,
कै. वैभव कुंजविहारी वाय. जी. तळपदे
यांच्या स्मरणार्थ एक हितचिंतक
२७) कै. डॉ. विद्याधर चंद्रकांत नारायण विजयकर यांच्या स्मरणार्थ हितचिंतक
२८) कै. पूर्णचंद्र केशरीनाथ राव व
कै. सौ. शीला पूर्णचंद्र राव यांच्या स्मरणार्थ
२९) डॉ. राम गोविंदराव नवलकर
३०) सौ. शुभांगी राम नवलकर
३१) सौ. रीटा आणि श्री. मंदार माधवराव नायक
३२) कै. सौ. विजया व श्री. प्रकाश माधव नायक या त्यांच्या आईवडिलांच्या स्मृत्यर्थ उन्मेष प्रकाश नायक
३३) सौ. वृंदा आणि श्री. शाम विनायक जयकर
३४) कै. श्रीमती जयश्री आणि कै. श्री. जयवंत विश्वनाथ कीर्तिकर स्मृत्यर्थ श्री. उमेशचंद्र जयवंत कीर्तिकर
३५) कै. श्रीमती प्रतिभा आणि कै. श्री. धाकलेश्वर बाळाजी जयकर स्मृत्यर्थ सौ. सुप्रिया उमेश कीर्तिकर

## प्रभुतरुणास देणगी

✶ सौ. मिनर्व्हा आणि श्री. ब्रिजलाल कन्हैयालाल कीर्तिकर यांजकडून त्यांच्या विवाहाच्या सुवर्ण महोत्सवाप्रीत्यर्थ रु. ११११/-

✶ सौ. उल्का सुरेश विजयकर यांजकडून प्रभुतरुणास भाऊबीज रु. १०००/-

✶ श्रीमती प्रतिभा वि. नवलकर हेरवाडकर याजंकडून आजीव सदस्यत्व रु. ५००/-

✶ सौ. नूतन आणि श्री. जयंत कीर्तिकर यांजकडून त्यांच्या लग्नाच्या चाळीसाव्या वाढदिवसा-निमित्त (दिनांक २-१-१५) रु. ५००/-

✶ श्री. विजय गजानन धुरंधरकडून आजीव सदस्यत्व रु. ५००/-

✶ सौ. प्रतिमा आणि श्री. विनोद प्रधान या आजीआजोबांच्या २६-१२-१४ रोजी साजरा झालेल्या विवाह सुवर्णमहोत्सवानिमित्त शनाक्ष, आस्तिका आणि आतिश या नातवंडांकडून रु. ५००/-

✶ श्री. आनंद डी. एम. कोठारे आणि कुटुंबीयांकडून त्यांची आई कै. श्रीमती सुशीला डी. एम. कोठारे यांच्या पंचविसाव्या स्मृतिदिनानिमित्त (२२-१२-१४) रु. २५०/-

✶ श्री. आनंद डी. एम. कोठारेकडून त्यांचा नातू कुमार मितीश कौशिक मोरवाले यांच्या क्रीडाक्षेत्रातील यशाप्रीत्यर्थ रु. १०१/- अकार-बारा वयोगटातील सायकल रेसमध्ये तो गोपी बिर्ला शाळेतून पहिला आला. हिंदू जिमखाना ते विल्सन कॉलेज असे तीन किलोमीटर्स अंतर त्याने कापले.

अभिनंदन मितांश!

## नववर्ष शुभकामना

**- सौ. उज्ज्वला र. ब्रम्हांडकर**

प्रसन्नतेचे आज उषेने
सूर नभीं छेडिले
वाजत गाजत चैतन्याचे
नववर्ष अवतरले
पक्षीगणांनी मधुर स्वरांनी
आसमंत भारले
कृपावंत त्या परमेशाचे
जणूं स्तवन गायिले
निष्क्रियतेचा अन्यायाचा
अंध:कार लोपला
मोदभरा अन् सृजनशील हा
उष:काल झाला
उत्साहाने प्रमुदित होऊनी
कार्यरत होऊया
जन्मभूमीवर स्तुतीकीर्तीची
पखरण होऊ द्या
कर्तृत्वाचा सोनचुरा हा
अखंड तळपत राहो
यशसिद्धीचा दीप्तीगोल तो
स्वयंप्रकाशित होवो

⁕

## प्रभुतरुणाची डायरी

### जनन

१३-१२-१४ सौ. श्रेया आणि डॉ. श्री. विद्याधर सुनील आगासकर, कन्या, अंधेरी
१४-१२-१४ सौ. मनिषा आणि श्री. जितांशु प्रफुल्ल कोठारे, पुत्र, जुहू
डॉ. निहाल जयपाल कोठारे पुत्र

### आत्याबाई नाव बोला

कु. व्हिधाना विक्रम सुनील जयकर, बोरीवली

### नारळसाखर दिला

२५-१२-१४ श्री. ऋषी तेज प्रताप वेलकर, कु. हर्षा नीलेश भालचंद्र कोठारे

### नांदा सौख्यभरे

१५-१२-१४ डॉ. कु. श्वेताली प्रदीप विजयकर श्री. रोहित अनंत भालेकर (आं.ज्ञातीय)
कु. अनिंदिता विद्याधर आगासकर, तरुष जितांशु कोठारे

### विवाह रौप्यमहोत्सव

२५-१२-१४ श्री. तुषार अनंत कीर्तिकर कु. सुजाता सुनील धुरंधर

### विवाह माणिकमहोत्सव

२-१-२०१५ सौ. नूतन आणि श्री. जयंत कीर्तिकर

### विवाह सुवर्णमहोत्सव

४-१२-१४ श्री. अजय शामसुंदर तळपदे कु. इना नवलकर
२१-१२-१४ श्री. ब्रिजलाल कन्हैयालाल कीर्तिकर, कु. मिनर्व्हा (उजू) मनोहर तळपदे
११-१२-१४ श्री. सुभाष केशवराव राव, कु. ज्योत्स्ना(कुंदा) मुकुंदराव त्रिलोकेकर

### मरण

| | | | |
|---|---|---|---|
| ०६-१२-१४ | श्री. अरुण (विलास) वसंतराव धराधर, | वय ७३, | वसई |
| ०९-१२-१४ | श्रीमती प्रतिभा देवदत्त वैद्य, | वय ९२, | भाई जीवनजी लेन, गिरगांव |
| १०-१२-१४ | श्रीमती श्रुतिका किशोर धुरंधर | वय ८२ | तळेगाव |
| ३१-१२-१४ | श्री. सुरेश आत्माराम कीर्तिकर | वय ८५ | दादर |
| ०३-०१-१५ | श्री. राजेंद्र खंडेराव धैर्यवान | वय ६९ | वसई |

(पान ५ कॉलम ४ वरून)

घडी, गाँव की गोरी, झीनत, जुगनू, हमजोली, लाल हवेली, नादान ह्या सर्व चित्रपटांतून आपला ठसा उमटविला. नंतर शौकत अली ह्यांच्याबरोबर नूरजहाँचे लग्न झाले. लग्नानंतर नूजहाँ मुंबईला आली. मधुर आवाजाने भारतीय रसिकांना इतके प्रभावित केले की आजही लतादीदी यांच्या काळात नुरजहाँ आवाजातील गीत लोक विसरलेले नाहीत. थँक्स टु ऑल इंडिया रेडिओ, तसेच टू विविध भारती व एफएम बँड ही आकाशवाणीची केंद्रे. नूरजहाँची जुनी गीते प्रसारीत करीत असतात. स्वरसम्राज्ञी नूरजहाँ १९४७ ला पाकिस्तानला गेल्यावर थेट पस्तीस वर्षांनी म्हणजे फेब्रुवारी १९८२ मध्ये भारतात आली. मर्त्यमानव, अमर्त्यसंगीत हा संगीत सोहळा मुंबईच्या 'षण्मुखानंद'हॉल मध्ये नुरजहाँच्या आगमनाप्रीत्यर्थ ११ फेब्रुवारी १९८२ रोजी आयोजित करण्यात आला होता. या समारोहात मेहमूद, लता मंगेशकर, नौशाद, दिलीप कुमार, मीनाकपूर, राजकुमारी, मोहम्मद रफी इत्यादी नवे जुने नावाजलेले अनेक कलाकार गायक - गायिका, नायक - नायिका संगीतकार आणि खच्चून भरलेला प्रेक्षकवर्ग यावेळी उपस्थित होते. यावेळी नुरजहाँने ''आवाज दे कहाँ है, दुनिया मेरी जवाँ है'' हे गाणे गाऊन श्रोतावर्गास भारावून टाकले. संपूर्ण हॉल टाळ्यांच्या कडकडाटाने वन्समोअरने निनादत गेला. अशा या स्वरसम्राज्ञीचे वयाच्या ७५ व्या वर्षी कराची (पाकिस्तान) येथे दिनांक २३ डिसेंबर २००० ला हृदय विकाराच्या झटक्याने निधन झाले. संगीतकार नौशाद यांनी नूरजहाँला श्रद्धांजली समर्पित करताना म्हटले होते की माझ्या गाण्यामध्ये नूर भरून नुरजहाँ या जगातून निघून गेली. एका ऐतिहासिक युगाचा अंत झाला.

हे मासिक मुद्रक, प्रकाशक श्रीमती सुहासिनी कीर्तिकर यांनी मालक बोर्ड ऑफ कंट्रोल प्रभुतरुण करिता मे. स्नेहेश प्रिंटर्स, ३२०-अ, शाह अँड नाहर इंडस्ट्रीयल इस्टेट, अ-१, धनराज मिल कंपाऊंड, सीताराम जाधव मार्ग, लोअर परेल, मुंबई-४०००१३ येथे छापून पारिजात बी-३, युनियन बँक एम्प्लॉईज को-ऑप. हौ. सोसायटी, पटेल इस्टेट, जोगेश्वरी (प.), मुंबई-४००१०२ येथे प्रकाशित केले.

संपादक: श्रीमती सुहासिनी कीर्तिकर RNI NO. 14613/67